॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** | **Public Relations Office (PRO)** | **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215325** | **जनसंपर्क कार्यालय** | **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/१९२ दि.१५/१०/२०२४

## वाचनाला व्यासंगाची जोड हवी - डॉ. दिलीप बलसेकर

वाचनामुळे व्यक्ती घडते आणि व्यक्तींच्या सामूहिक प्रयत्नातून राष्ट्र उभे राहते. वाचनाला व्यासंगाची जोड मिळाली की व्यक्ती आणि समूह या दोघांचेही भविष्य बदलते. डॉ. कलाम यांच्या स्वप्नातील भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी तरुणांनी वाचनाचा व्यासंग जपावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटियर विभागाचे सचिव डॉ. दिलीप बलसेकर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीवी कला संकुल आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त ऑनलाईन नाट्य अभिवाचन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून डॉ. दिलीप बलसेकर बोलत होते. यावेळी संकुलाचे संचालकडॉ. पृथ्वीराज तौर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. तौर यांनी वाचन प्रेरणा दिनाच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे आणि जयवंत दळवी यांच्या कार्याचा व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेतला.

प्रा. कैलास पुपुलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गौरी चौधरी, अखिलेश पांचाळ, अजिंक्य जाधव, अनिल दुधाटे, सिद्धार्थ कांबळे, अमित सोनकांबळे, अंकुश भारती, अरुण गावडे आणि संदीप भावे यांनी आचार्य प्रल्हाद केशव अत्रे आणि जयवंत दळवी यांच्या नाटकातील प्रसंगांचे अभिवाचन केले.

---